ePaper

'मतदार यादीतील घुसखोरांना काँग्रेस संरक्षण देतंय'; अमित शाह

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

मोशीकरांच्या आरोग्याशी तडजोड नाही

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 31 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

केंद्र सरकारकडून मदतीमध्ये मोठी वाढ; दुष्काळग्रस्तांना आधार

नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना केंद्रीय दिलासा

महाईन्यूज । मुंबई

अतिवृष्टी, पूर आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान सोसणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एनडीआरएफ) मदतीच्या निकषांमध्ये वाढ केली आहे. त्यानुसार शेती, फळबागा, पशुधन, कुक्कुटपालन तसेच घरांच्या नुकसानीपोटी मिळणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मिळणारी मदत चार लाखांवरून आठ लाख रुपये करण्यात आली आहे. नव्या निर्णयामुळे आपत्तीग्रस्त शेतकरी आणि बाधित कुटुंबांना पूर्वीपेक्षा अधिक आर्थिक आधार मिळणार आहे.

शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

केंद्र सरकारने एनडीआरएफच्या निकषांत वाढ करण्याचा चांगला निर्णय घेतला आहे. हवामान बदलामुळे वाढलेल्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा ठरणार आहे, असे मत मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी व्यक्त केले आहे.



सुधारित निकषांनुसार जिरायती आणि खरीप शेतीच्या नुकसानीसाठी दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टर ११ हजार रुपये मदत मिळणार आहे. यापूर्वी ही रक्कम ८ हजार ५०० रुपये होती. बागायती शेतीसाठीची मदत १७ हजारांवरून २२ हजार रुपये, तर फळबागांच्या नुकसानीसाठीची मदत २२ हजार ५०० रुपयांवरून ३० हजार रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे शेतीच्या विविध प्रकारांतील नुकसानभरपाईच्या रकमेत लक्षणीय वाढ झाली आहे.

पशुधनाच्या नुकसानीपोटी मिळणाऱ्या मदतीतही वाढ करण्यात आली आहे. गाय, म्हैस, घोडा आणि उंट यांसारख्या मोठ्या जनावरांसाठी आता ५० हजार रुपये मिळणार आहेत. यापूर्वी ही मदत ४० हजार रुपये होती. शेळी, मेंढी आणि डुक्कर यांसारख्या लहान जनावरांसाठीची मदत चार हजारांवरून ५ हजार १०० रुपये, तर गाढव आणि खेचर यांसारख्या ओझी वाहणाऱ्या प्राण्यांसाठीची मदत २० हजारांवरून २५ हजार ४०० रुपये करण्यात आली आहे. कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळाला असून, कोंबडीच्या नुकसानीपोटी प्रति कोंबडी १०० रुपयांऐवजी १३० रुपये मदत मिळणार आहे. ही मदत कमाल १०० कोंबड्यांपर्यंत मर्यादित असेल.

नैसर्गिक आपत्तीमुळे घरांचे नुकसान झाल्यास मिळणाऱ्या मदतीतही वाढ करण्यात आली आहे. पूर्णतः पडझड झालेल्या घरांसाठीची मदत एक लाख २५ हजारांवरून एक लाख ६० हजार रुपये करण्यात आली आहे. दुर्गम भागातील घरांसाठी ही मदत एक लाख ३० हजारांवरून एक लाख ७० हजार रुपये, तर घरांच्या अंशतः नुकसानीसाठीची तात्पुरती मदत पाच हजारांवरून ८ हजार ५०० रुपये करण्यात आली आहे. याशिवाय बचावकार्यादरम्यान मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांनाही मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

एनडीआरएफचे सुधारित निकष आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार आहेत. त्यामुळे १ एप्रिल २०२६ पासून झालेल्या नैसर्गिक आपत्तीतील नुकसानीसाठी हे नवे दर लागू होण्याची शक्यता आहे. मात्र, राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास या वाढीव निकषांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार का, याबाबत उत्सुकता आहे. दुष्काळी मदतीसाठी केंद्र सरकारकडे यापूर्वीच प्रस्ताव पाठविण्यात आला असल्यास त्यात सुधारित दरांनुसार बदल करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच केंद्राच्या सुधारित निकषांच्या अंमलबजावणीसाठी राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी आवश्यक असल्याने त्यानंतरच राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकेल.

१ एप्रिल २०२६ पासून अंमलबजावणी ?

एनडीआरएफच्या मदतीचे नवीन निकष आर्थिक वर्षे २०२६ – २७ ते २०३० – ३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार आहेत. हे निकष २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून लागू होण्याची तरतूद असल्याने राज्यात १ एप्रिल २०२६ नंतर झालेल्या नुकसानासाठीही हे नवे दर लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुष्काळाच्या मदतीत वाढ होणार का, अशी उत्सुकता निर्माण झाली आहे. तसे झाले तर दुष्काळी मदतीसाठी केंद्र सरकारला नव्याने सुधारित प्रस्ताव पाठवावा लागणार आहे. दुसरीकडे केंद्र सरकारने वाढविलेल्या मदत निकषांना राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी द्यावी लागणार आहे. त्यानंतरच अंमलबजावणी करता येणार आहे.

दरम्यान, केंद्र सरकारचा हा निर्णय नैसर्गिक आपत्तींचा वाढता फटका सहन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हवामान बदलामुळे अतिवृष्टी, पूर आणि दुष्काळाच्या संकटांची तीव्रता वाढत असताना नुकसानभरपाईच्या रकमेत झालेली वाढ दिलासादायक मानली जात आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनीही या निर्णयाचे स्वागत केले असून, नैसर्गिक आपत्तींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा असल्याचे मत व्यक्त केले आहे.

१५८ मिमी पावसाने बारामतीला झोडपले!

सखल भागांत पाणी; सुनेत्रा पवारांकडून अधिकाऱ्यांना सतर्कतेच्या सूचना

महाईन्यूज । पुणे

बारामती शहर आणि परिसरात मध्यरात्रीपासून झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अवघ्या काही तासांत १५८ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याने शहरातील सखल भाग जलमय झाले असून, अनेक रस्त्यांवर पाणी साचले आहे. विशेषतः भिगवण रोड परिसरात पाणी साचल्याने नागरिक आणि वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रशासनाशी दूरध्वनीवरून संपर्क साधत परिस्थितीचा आढावा घेतला आणि तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. विशेषतः चारा पिकांसाठी हा पाऊस फायदेशीर ठरणार असून, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे. मात्र, दुसरीकडे बागायती पट्ट्यातील काढणीला आलेल्या तरकारी पिकांना पावसाचा फटका बसला आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने भाजीपाला पिकांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यामुळे काही पिकांना दिलासा, तर काही पिकांना नुकसान अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झाली आहे.

संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. शहरासह तालुक्यातील पावसाच्या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, नागरिक आणि प्रवाशांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पावसामुळे झालेल्या संभाव्य नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ठिकाणी पंचनामे करावेत आणि त्याचा अहवाल सादर करावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याचे आव्हान आता प्रशासनासमोर आहे.



शेतकऱ्यांना दिलासा, पिकांचे नुकसान

बारामती परिसरात झालेल्या १५८ मिलिमीटर पावसामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. चारा पिकांसाठी हा पाऊस फायदेशीर ठरणार असला, तरी बागायती क्षेत्रातील काढणीला आलेल्या भाजीपाला व तरकारी पिकांचे नुकसान झाले आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने शेतकऱ्यांसमोर नव्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

तातडीने पाण्याचा निचरा करा

शहरातील पाणी साचलेल्या भागांची माहिती घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे आणि नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याशी चर्चा केली. भिगवण रोडसह अन्य सखल भागांत साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा करावा, तसेच जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

ऑक्टोबर हिटला पावसाचा ब्रेक; पुणेकरांना दिलासा!

महाईन्यूज । पुणे

गेल्या काही दिवसांपासून ऑक्टोबर हिटच्या तीव्र उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना मुसळधार पावसाने मोठा दिलासा दिला आहे. पुणे शहर, उपनगरे आणि ग्रामीण भागात काल रात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. संततधारेमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने कोकण आणि मध्य महाराष्ट्रासाठी यलो अलर्ट जारी केला असून पुढील २४ ते ४८ तासांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे.

पुणे शहरातील मध्यवर्ती पेठांसह शिवाजीनगर, हडपसर, कोथरूड, औंध, बाणेर, बालेवाडी, वारजे, सिंहगड रस्ता, कात्रज आणि कोंढवा परिसरात मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळे काही रस्त्यांवर पाणी साचले. रात्री उशिरा सुरू झालेली पावसाची संततधार सकाळीही कायम होती. अनेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी सुरू असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही पावसाने दमदार हजेरी लावली. बारामती, इंदापूर, आंबेगाव, जुन्नर आणि जेजुरीसह विविध तालुक्यांमध्ये चांगला पाऊस झाला. दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या पावसामुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे. रब्बी हंगामातील पेरण्या आणि उभ्या पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाने हजेरी लावली. त्यामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ होण्यास मदत होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईची चिंता असलेल्या पुणेकरांसाठी ही दिलासादायक बाब ठरली आहे. मात्र, प्रत्यक्ष पाणीसाठ्यातील वाढ स्पष्ट होण्यासाठी अधिकृत आकडेवारी महत्त्वाची ठरणार आहे.

दरम्यान, हवामान विभागाने कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुढील २४ ते ४८ तासांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, मेघगर्जना सुरू असताना झाडाखाली किंवा उघड्या जागेत थांबणे टाळावे, तसेच आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



पुढील ४८ तास पावसाचा इशारा

कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत पुढील २४ ते ४८ तासांत विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पावसासोबतच वादळी वारे आणि विजांचा धोका लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहावे. मेघगर्जना सुरू असताना झाडाखाली किंवा उघड्या जागेत थांबणे टाळावे, तसेच आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मोशीकरांच्या आरोग्याशी तडजोड नाही


ग्रामस्थांच्या मागण्यांची दखल; कचरा डेपोच्या प्रश्नावर आमदार महेश लांडगे सरसावले!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

मोशी कचरा डेपोमुळे निर्माण होणाऱ्या दुर्गंधी, प्रदूषण आणि आरोग्यविषयक समस्यांच्या सोडवणुकीसाठी महापालिका प्रशासनाकडे आणि प्रसंगी राज्य शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करणार असल्याची भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मांडली. मोशीतील ग्रामस्थ व नागरिकांनी त्यांची भेट घेऊन कचरा डेपोशी संबंधित अडचणी मांडल्या आणि उपाययोजनांच्या मागण्यांचे निवेदन दिले.

मोशी कचरा डेपोवरील वाढत्या भारामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी यावेळी सांगितले. डेपोची क्षमता संपत असल्याची चिंता व्यक्त करताना, त्याची सद्यस्थिती, पर्यावरणीय परिणाम आणि कार्यपद्धतीची तातडीने तांत्रिक तपासणी करून अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, नगरसेविक अर्चना सस्ते, नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, नगरसेविका सुजाता बोराटे, नगरसेविका सारिका गायकवाड, नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, सोसायटी फेडरेशनेचे संजीवन सांगळे, मा. नगरसेविका कविता आल्हाट, मा. नगरसेवक धनंजय आल्हाट, अतिश बारणे, ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, निलेश बोराटे, प्रकाश आल्हाट, निखिल सस्ते, नितीन बोऱ्हाडे, राजेश सस्ते यांच्यासह ग्रामस्थ आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



कालबद्ध कृती आराखड्याची मागणी

कचरा डेपोचा भविष्यातील वापर, क्षमता आणि पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजनांसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करून तो ग्रामस्थांसमोर सादर करावा. मोशी ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित तज्ज्ञांची बैठक घेऊन नागरिकांच्या सूचना व हरकती विचारात घ्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या समस्या आणि सूचना जाणून घेतल्यानंतर आमदार लांडगे यांनी या मागण्यांबाबत पाठपुरावा करण्याची भूमिका स्पष्ट केली. नागरिकांचे आरोग्य, पर्यावरणाचे संरक्षण आणि इंद्रायणीचे संवर्धन लक्षात घेऊन ठोस व दीर्घकालीन उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे आणि गरज भासल्यास राज्य शासनाकडे आवश्यक पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

कचरा व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणाचा आग्रह

या निधीतून रस्ते, लहान पूल, पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, गटारे, समाजमंदिरे, सार्वजनिक वाचनालये, प्राथमिक शाळांमधील आवश्यक दुरुस्ती, सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा, उद्याने, महापालिकेच्या जागांवरील खेळणी व व्यायाम साहित्य, पादचारी सुविधा, तसेच इतर आवश्यक नागरी कामे करता येणार आहेत. याशिवाय सार्वजनिक शौचालये, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, स्मशानभूमीतील मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित कामांचाही समावेश आहे. मात्र, खासगी इमारतींची दुरुस्ती, अनधिकृत वस्त्यांमधील कामे, अनुदानित संस्थांची काही कामे, मोठ्या स्वरूपाची स्वतंत्र बांधकामे आणि स्वेच्छा निधीच्या उद्देशाशी सुसंगत नसलेली कामे या निधीतून करता येणार नाहीत. काही विशिष्ट कामांसाठी स्वतंत्र अटी व निर्बंधही नमूद करण्यात आले आहेत.

> “मोशीकरांनी भेट घेऊन कचरा डेपोमुळे भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजनांच्या मागण्या मांडल्या आहेत. नागरिकांचे आरोग्य आणि इंद्रायणीचे संरक्षण यांना प्राधान्य देत या मागण्यांबाबत महापालिका प्रशासनाकडे आणि प्रसंगी राज्य शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करू. कचरा व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कालबद्ध उपाययोजना व्हाव्यात, यासाठी आग्रही आहोत. ”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.


लग्न जमेना! तरुण चढला थेट मोबाईल टॉवरवर; ३ तासांचा 'शोले' स्टाईल ड्रामा

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

लग्न जुळत नसल्याच्या वैफल्यातून एका तरुणाने चक्क मोबाईल टॉवरवर चढून प्रशासनाची झोप उडवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्याजवळील मामुर्डी परिसरात रविवारी सायंकाळी हा 'शोले' स्टाईल हायव्होल्टेज ड्रामा रंगला. तब्बल साडेतीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी 'ब्रांटो' वाहनाच्या मदतीने या तरुणाला सुखरूप खाली उतरवले, तेव्हा कुठे उपस्थित नागरिक आणि प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड परिसरातील मामुर्डी येथील गहुंजे रस्त्यावर रविवारी सायंकाळच्या सुमारास एक तरुण उंच मोबाईल टॉवरवर चढल्याचे स्थानिक नागरिकांच्या लक्षात आले. भरवस्तीत टॉवरवर तरुण चढल्याचे दिसताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली. सुरुवातीला तो टॉवरवर का चढला याचा कोणालाही अंदाज येत नव्हता, मात्र चौकशीअंती लग्न जमत नसल्याच्या कारणावरून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे स्पष्ट झाले.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलास पीएमआरडीएच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती अत्यंत नाजूक बनली होती. एका बाजूला उंचावर बसलेला हट्टी तरुण, खाली जमलेली प्रचंड गर्दी आणि खाली उभे राहून तरुणाला खाली उतरण्यासाठी गयावया करणारी त्याची नियोजित वधू, असे अत्यंत भावनिक व तणावपूर्ण दृश्य तिथे पाहायला मिळत होते.




तरुणाला कोणतीही इजा न होता सुरक्षित बाहेर काढणे हे जवानांसमोर मोठे आव्हान होते. अखेर अत्याधुनिक 'ब्रांटो' वाहनाची (हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म) मदत घेऊन बचावकार्य हाती घेण्यात आले. तब्बल साडेतीन तास जवानांची शर्थीची कसरत सुरू होती. जवानांनी अत्यंत संयम आणि कौशल्याने तरुणाशी संवाद साधत त्याला विश्वासात घेतले आणि सुरक्षितरीत्या खाली आणले. या थरारनाट्यामुळे परिसरात काही काळ प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

लग्नाचा प्रश्न आणि टोकाचे पाऊल ; मानसिक तणावाचाही मुद्दा ऐरणीवर

लग्नाशी संबंधित वैयक्तिक अडचणींमुळे एका तरुणाने स्वतःचा जीव धोक्यात घालणारे पाऊल उचलल्याने मानसिक तणाव आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा प्रश्नही पुढे आला आहे. कौटुंबिक किंवा वैयक्तिक समस्यांवर संवादातून मार्ग काढणे महत्त्वाचे असून अशा प्रसंगांत संबंधित व्यक्तीला समुपदेशन आणि भावनिक आधार मिळण्याची गरज अधोरेखित होते. दरम्यान, या घटनेतील तरुणाला सुरक्षित खाली उतरवण्यात यश आले असले, तरी त्याने टॉवरवर चढण्यामागील नेमकी परिस्थिती अधिकृत चौकशीनंतर स्पष्ट होऊ शकेल.

भूमिका

सिंहस्थाचा धर्मध्वज उंचावला; आता व्यवस्थेचा कस!



गोदाकाठी धर्मध्वज उंचावून नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या सिंहस्थ पर्वाचा मंगलारंभ झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीने या सोहळ्याला विशेष प्रतिष्ठा लाभली. शंखनाद, गोदा आरती आणि साधू-महंतांच्या उपस्थितीत श्रद्धेच्या या महापर्वाची सुरुवात उत्साहात झाली. मात्र, धर्मध्वजारोहण म्हणजे तयारी पूर्ण झाल्याची घोषणा नव्हे, तर आगामी आव्हानांची जाणीव करून देणारा प्रारंभ आहे.

आता प्रशासनाला उत्सवाच्या भव्यतेतून प्रत्यक्ष व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेकडे वळावे लागेल. सिंहस्थ हा श्रद्धा, परंपरा आणि सामूहिक भावनेचा विशाल सोहळा आहे. लाखो भाविकांच्या सहभागातून त्याचे व्यापक स्वरूप साकारते. त्यामुळे या पर्वाचे आयोजन करताना शासनाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. मात्र, सरकारी उपस्थिती आणि प्रसिद्धीपेक्षा भाविकांना मिळणाऱ्या सुविधा, सुरक्षितता आणि नियोजनाचा दर्जा अधिक महत्त्वाचा ठरतो. सिंहस्थाच्या केंद्रस्थानी श्रद्धाळू, साधू-संत, गोदावरी आणि यजमान शहर असायला हवे.

नाशिककरांच्या रोजच्या जगण्याकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. विकासकामांसाठी खोदलेले रस्ते, धूळ, वाहतूक कोंडी आणि विविध अडथळ्यांचा त्रास नागरिक अनेक महिन्यांपासून सहन करीत आहेत. मोठ्या पाहुण्यांच्या आगमनापूर्वी शहरातील काही भाग चकाचक होतात; मात्र उर्वरित शहराला त्याच तत्परतेचा लाभ का मिळू नये? तात्पुरती डागडुजी आणि रंगरंगोटीच्या माध्यमातून अव्यवस्था झाकण्याऐवजी टिकाऊ नागरी सुविधा उभारण्यावर भर दिला पाहिजे. सिंहस्थाच्या प्रमुख अमृतस्नान पर्वण्या ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२७ मध्ये होणार आहेत. त्यामुळे उपलब्ध कालावधीचा नियोजनबद्ध वापर करणे आवश्यक आहे. प्रचंड गर्दी, पावसाळा, नदीची पातळी, वाहतूक आणि स्थानिकांचे दैनंदिन व्यवहार यांचा एकत्रित विचार करून व्यवस्थापनाची आखणी करावी लागेल. धर्मध्वजारोहणाच्या नियंत्रित सोहळ्याचे यश म्हणजे लाखो भाविकांच्या सुरक्षित पर्वणीची हमी नव्हे.

रस्त्यांची कामे कधी पूर्ण होणार, सांडपाणी नदीत जाणे कसे थांबवणार, वाहनतळांपासून घाटांपर्यंत वाहतूक व्यवस्था किती सक्षम असेल, गर्दी व्यवस्थापनाच्या चाचण्या कधी होणार, अशा प्रश्नांची स्पष्ट उत्तरे प्रशासनाने दिली पाहिजेत. प्रत्येक कामाची मुदत, जबाबदार यंत्रणा आणि प्रत्यक्ष प्रगती नागरिकांसमोर मांडली पाहिजे. स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि महिला, लहान मुले व वृद्धांसाठीच्या सुविधांची खात्री प्रत्यक्ष पाहणी आणि सरावातून पटवावी लागेल. या तयारीत स्थानिक नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा आहे. व्यापारी, रिक्षाचालक, स्वयंसेवी संस्था आणि घाटालगतच्या रहिवाशांच्या अनुभवातून नियोजनातील उणिवा शोधल्या पाहिजेत. नागरिकांना केवळ निर्बंध कळवण्याऐवजी त्यांना आयोजनाचे भागीदार बनवले पाहिजे.

सिंहस्थासाठी होणारा खर्च हा केवळ एका पर्वापुरता मर्यादित न राहता नाशिकच्या भविष्यासाठीची गुंतवणूक ठरायला हवा. पर्व संपल्यानंतरही शहराला चांगले रस्ते, स्वच्छ नदी, सक्षम सार्वजनिक वाहतूक आणि सुधारित नागरी सुविधा मिळाल्या पाहिजेत. विश्वविक्रमांनी शहराचे नाव उंचावते; मात्र उत्तम व्यवस्थापनातून नागरिकांचा विश्वास वाढतो. धर्मध्वज उंचावला आहे, आता कामाचा दर्जा, पारदर्शकता आणि सामान्यांच्या जगण्याची पतही उंचावली पाहिजे. सिंहस्थाचा खरा गौरव सोहळ्याच्या भव्यतेत नव्हे, तर प्रत्येक भाविकाच्या सुरक्षित, स्वच्छ आणि सन्मानपूर्ण अनुभवात आहे.

प्रासंगिक »

निःशब्द मदत

एका गावात वार्षिक चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. अनेक मुलांनी सुंदर चित्रे काढली होती. त्यात एका गरीब मुलीनेही सहभाग घेतला होता. तिच्याकडे रंग कमी असल्यामुळे तिचे चित्र अपूर्ण राहिले होते.

स्पर्धेच्या दिवशी ती निराश होऊन एका कोपऱ्यात बसली होती. तेवढ्यात दुसऱ्या वर्गातील एका मुलाने तिची अडचण पाहिली. त्याने स्वतःचे काही रंग तिच्यासमोर ठेवले; मात्र आपण मदत केली हे कोणालाही सांगितले नाही.

मुलीने आनंदाने चित्र पूर्ण केले. निकाल जाहीर झाला तेव्हा तिला विशेष पारितोषिक मिळाले. सर्वजण तिचे कौतुक करीत होते. तिने मात्र व्यासपीठावर जाऊन त्या अनोळखी मदतनीसाचे आभार मानले.

तेव्हा तो मुलगा पुढे आला. त्याच्या चेहऱ्यावर समाधान होते. शिक्षकांनी त्याला विचारले, "तू मदत केल्याचे आधी का सांगितले नाहीस?" तो म्हणाला, "मदत केल्याचे कौतुक मिळवण्यापेक्षा कोणाचे स्वप्न पूर्ण होणे महत्त्वाचे आहे."

- तात्पर्य : खऱ्या मदतीला प्रसिद्धीची नव्हे, तर निःस्वार्थ भावनेची गरज असते.

महाराष्ट्राच्या राजकारणात कधी कोणते वळण येईल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे. अलीकडेच देवेंद्र फडणवीस आणि ठाकरे बंधू एका व्यासपीठावर आले आणि राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले.

ठाकरे बंधूंच्या मध्ये देवाभाऊ; राजकीय चर्चांना उधाण!



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका बाजूला राज ठाकरे, तर दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे बसलेले चित्र अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरले. या भेटीतून राजकीय संबंधांचे नवे पदर उलगडण्याची शक्यता व्यक्त होऊ लागली आहे. ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, अशी इच्छा अनेक शिवसैनिक आणि समर्थक व्यक्त करीत होते. मात्र, या दोघांच्या मध्ये फडणवीस बसल्याने राजकीय चर्चेला वेगळेच वळण मिळाले. काहींना हे चित्र सुखावणारे वाटले, तर काहींना त्यातून नव्या राजकीय समीकरणांची भीती जाणवली. विशेषतः भाजप आणि शिवसेनेच्या राजकीय वाटचालीच्या पार्श्वभूमीवर या भेटीचे महत्त्व अधिक वाढले. या कार्यक्रमातील तिघांची देहबोली, हसतखेळत झालेला संवाद आणि एकमेकांशी साधलेला सहज संपर्क यांची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्या कानात काहीतरी सांगणे आणि त्यावर फडणवीस यांनी हसून दिलेली प्रतिक्रिया अनेकांनी टिपली. राज ठाकरे यांनी २०२९ पर्यंत फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदावर ठेवण्याबाबत केलेले विधानही सूचक मानले जात आहे.

फडणवीस यांनी २०१९ पूर्वी उद्धव ठाकरे यांनी फोन केल्यावर आपण प्रत्येक वेळी त्यांच्या मदतीला गेलो, मात्र त्यानंतर त्यांनी फोन केला नाही, असे सांगितले. या विधानातून जुन्या संबंधांची आठवण आणि भविष्यातील संवादाची शक्यता अधोरेखित झाली. दुसरीकडे, संजय राऊत आणि आशिष शेलार यांची एका व्यासपीठावरील भेटही चर्चेचा विषय ठरली. सुडाचे राजकारण संपले पाहिजे, असे राऊत यांनी सांगितले, तर शेलार यांनीही राऊत यांच्यासोबत बसण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली. या घडामोडींमुळे भाजप, शिवसेना आणि ठाकरे गटांतील राजकीय समीकरणांबाबत अनेक तर्कवितर्क सुरू झाले आहेत. बदलत्या राजकीय वातावरणात ठाकरे बंधूंची भूमिका महत्त्वाची ठरू शकते, अशी चर्चा आहे. मात्र, एका व्यासपीठावरील उपस्थिती किंवा सहज संवाद यावरून युती अथवा राजकीय निर्णयांचे निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

राजकारणात संवादाचे दरवाजे कधीच पूर्णपणे बंद होत नसतात. वैचारिक मतभेद असूनही नेत्यांमध्ये संवाद होणे ही लोकशाहीची सकारात्मक बाब आहे. त्यामुळे या भेटीकडे केवळ राजकीय डावपेच म्हणून न पाहता बदलत्या राजकीय वातावरणाचे प्रतिबिंब म्हणून पाहणे आवश्यक आहे. फडणवीस आणि ठाकरे बंधूंच्या मनात नेमके काय आहे, हे सध्या सांगता येणार नाही. ही भेट केवळ दिवाळीतील फटाक्यांचा आवाज ठरणार की महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची नांदी ठरणार, याचे उत्तर आगामी काळच देईल. तोपर्यंत राजकीय चर्चांचा धुरळा उडत राहणार, हे मात्र निश्चित!

।। अभंगवाणी ।।



चोरें चोरातें करावा उपदेश ।
आपुला अभ्यास असेल तो ॥१॥

शिंदळीच्या मागें वेचितां पाउलें ।
होईल आपुलें तिच्या ऐसें ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

जंगलातील विकासाला वन्यजीव सुरक्षेची अट!

अधिवासाचे विभाजन झाल्यास अंडरपास-ओव्हरपास उभारावे लागणार; वन विभागाचे नवे परिपत्रक.

महाईन्यूज । मुंबई

जंगलातून जाणारे रस्ते, रेल्वेमार्ग आणि अन्य पायाभूत सुविधा प्रकल्प उभारताना वन्यजीवांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे निर्देश राज्याच्या वन विभागाने दिले आहेत. वनक्षेत्र किंवा वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे विभाजन होत असल्यास, स्थानिक परिस्थितीनुसार अंडरपास, ओव्हरपास यांसारख्या उपाययोजना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या उपाययोजनांचा समावेश प्रकल्पाच्या सविस्तर अहवालात करण्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

वन विभागाने सोमवारी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे संबंधित वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना प्रकल्प प्रस्तावांची सखोल तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वन्यजीवांच्या सुरक्षित हालचालींसाठी आवश्यक उपाययोजनांचा समावेश न करताच काही प्रकल्प प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केले जात असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे वन विभागाने ही बाब गांभीर्याने घेत नव्या सूचना जारी केल्या आहेत.

रस्ते आणि रेल्वेमार्गांच्या विस्तारामुळे विकासाला गती मिळत असली, तरी त्याचा वन्यजीवांच्या अधिवासावर परिणाम होत आहे. जंगलातून जाणाऱ्या मार्गांमुळे प्राण्यांचे पारंपरिक भ्रमणमार्ग खंडित होतात. अन्न आणि पाण्याच्या शोधात रस्ता ओलांडताना वाहनांची धडक बसून अनेक वन्यप्राण्यांचा मृत्यू होतो. हा धोका टाळण्यासाठी अंडरपास आणि ओव्हरपाससारख्या सुरक्षित मार्गांची तरतूद करणे आवश्यक ठरणार आहे.



प्रकल्प प्रस्तावांची छाननी करताना संबंधित मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक आणि उपवनसंरक्षक यांनी वन्यजीवांच्या हालचालींचा विचार करावा. वनक्षेत्राचे किंवा अधिवासाचे विभाजन होत असल्यास संबंधित ठिकाणची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन योग्य उपाययोजना निश्चित कराव्यात. त्यानंतरच प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश वन सचिव संजय खंदारे यांनी दिले आहेत.

वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० आणि वन (संरक्षण व संवर्धन) नियम, २०२३ अंतर्गत जारी मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने हे परिपत्रक काढण्यात आले आहे. वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) डॉ. जितेंद्र रामगावकर यांच्या स्वाक्षरीने हे परिपत्रक जारी करण्यात आले असून, राज्यातील सर्व वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे.

विकास प्रकल्पांचे नियोजन करतानाच वन्यजीवांसाठी सुरक्षित मार्गांची व्यवस्था केल्यास अपघात आणि अधिवासावरील परिणाम कमी करता येऊ शकतात. मात्र, या निर्देशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, यावर वन्यजीवांचे संरक्षण अवलंबून राहणार आहे.

वन्यजीवांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

जंगलातून जाणाऱ्या रस्ते आणि रेल्वे प्रकल्पांमुळे वन्यप्राण्यांचे नैसर्गिक भ्रमणमार्ग खंडित होतात. अनेकदा रस्ता ओलांडताना वाहनांची धडक बसून प्राण्यांचा मृत्यू होतो. हा धोका टाळण्यासाठी प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यातच अंडरपास, ओव्हरपास यांसारख्या सुरक्षित मार्गांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि वन्यजीवांच्या हालचालींचा अभ्यास करून उपाययोजना निश्चित करण्याचे निर्देश वन विभागाने दिले आहेत.

मक्केत १३० यात्रेकरू अडकले; सांगलीत कुटुंबीयांचा जीव टांगणीला!

महाईन्यूज । सांगली

उमराह यात्रेसाठी सौदी अरेबियातील मक्का येथे गेलेल्या सांगली जिल्ह्यातील १३० यात्रेकरूंचा परतीचा प्रवास रखडला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून हे यात्रेकरू मक्केत अडकून पडले असून, विमान उड्डाणे रद्द झाल्याने त्यांच्या घरवापसीचा प्रश्न निर्माण झाला आहे. आपल्या आप्तेष्टांच्या सुरक्षित परतीची प्रतीक्षा करणाऱ्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

सांगली जिल्ह्यातील विविध भागांतील हे नागरिक गेल्या महिन्यात ९ तारखेला उमराह यात्रेसाठी सौदी अरेबियाला रवाना झाले होते. धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर नियोजित वेळापत्रकानुसार त्यांना भारतात परतायचे होते. मात्र, अचानक विमान उड्डाणे रद्द झाल्याने परतीचे नियोजन विस्कळीत झाले. परिणामी, गेल्या पंधरा दिवसांपासून त्यांना मक्केतच थांबावे लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सौदी अरेबियातील रियाध येथील किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळावर १० ऑक्टोबर रोजी येमेनी हुथी बंडखोरांनी केलेल्या हल्ल्यानंतर भारतीय विमान कंपन्यांनी काही उड्डाणे रद्द केली आहेत. त्यामुळे यात्रेकरूंच्या प्रवासावर परिणाम झाला आहे. परतीसाठी पर्यायी विमान व्यवस्था कधी उपलब्ध होणार, याबाबत स्पष्टता नसल्याने यात्रेकरूंची आणि त्यांच्या नातेवाईकांची अस्वस्थता वाढली आहे.

मक्केतील मुक्काम वाढल्याने यात्रेकरूंसमोर निवास, भोजन आणि पुढील



प्रवासाचे नियोजन असे प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अधिक गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. अनेक कुटुंबीयांकडून दररोज आपल्या नातेवाइकांशी संपर्क साधून त्यांच्या परिस्थितीची माहिती घेतली जात आहे.

दरम्यान, मिरजेतील यात्रेकरू बाळासाहेब मिरजकर यांनी भारत सरकार आणि सौदी अरेबियातील भारतीय दूतावासाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. सांगली जिल्ह्यातील सर्व १३० यात्रेकरूंना सुरक्षितपणे भारतात परत आणण्यासाठी विशेष विमान व्यवस्था किंवा पर्यायी प्रवासाचे नियोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> “विमाने रद्द झाल्याने गेल्या पंधरा दिवसांपासून आम्ही मक्का येथे अडकलो आहे. टूर कंपनीने जेवण राहण्याची व्यवस्था केली असली तरी आता चिंता वाटू लागली आहे. अनेक यात्रेकरू वृद्ध असून त्यांच्याकडील औषधे व पैसे संपत आले आहेत. त्यामुळे तातडीने यात्रेकरूंना परत देशात आणण्यासाठी प्रयत्न व्हावेत.”
>
> - बाळासाहेब मिरजकर, यात्रेकरू


> “सौदीमध्ये सांगली जिल्ह्यातील यात्रेकरू अडकल्याची माहिती मिळाली आहे. त्यांना परत आणण्यासाठी भारत सरकारशी संपर्क करत आहोत. आम्ही त्यांच्या कुटुंबीयांच्या संपर्कातही आहोत. यात्रेकरुंच्या कुटुंबियांनी चिंता करु नये.”
>
> - विशाल पाटील, खासदार, सांगली

अमेरिकेत विमान कोसळून ९ जणांचा मृत्यू

अंगावर काटा आणणारा व्हिडीओ समोर, रस्त्यावर पडला खोल खड्डा

महाईन्यूज । अमेरिका

अमेरिकेतील फ्लोरिडामध्ये भीषण विमान अपघात झाला आहे. यामध्ये ९ जणांचा मृत्यू झाला आहे. फ्लोरिडामध्ये एक खासगी विमान थेट रस्त्याच्या मध्यभागी कोसळले. रस्त्यावर आदळताच विमानाचा स्फोट झाला. तसेच स्फोटामुळे रस्त्यावर एक खोल खड्डा पडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचा थरकाप उडवणारा व्हिडीओही व्हायरल झाला आहे.



फ्लोरिडामध्ये एक विमान थेट रस्त्याच्या मध्यभागी कोसळले. विमान आदळताच एक मोठा स्फोट झाला आणि रस्त्यावर आगीच्या ज्वाळा पसरल्या. या स्फोटामुळे रस्त्यावर एक खोल खड्डा पडला असून, विमानाचे अवशेष सर्वत्र विखुरले गेले आहेत. अपघाताच्या वेळी विमानात ९ लोक होते, अपघातात या सगळ्यांचा मृत्यू झाला आहे. विमान कोसळले तेव्हा रस्त्यावर इतर कोणी व्यक्ती उपस्थित होत्या का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. सदर अपघाताचा थरारक व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

विमान अपघाताची घटना जवळच असलेल्या कारमधील व्यक्तींनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. व्हिडीओमध्ये विमान आकाशातून वेगाने खाली येताना आणि रस्त्यालगत आदळल्यानंतर त्याचा स्फोट होताना स्पष्टपणे दिसत आहे. या अपघातामुळे जमिनीवर एक मोठा खड्डा पडला असून, त्याभोवती आगीच्या ज्वाळा पसरल्या होत्या. विमान घरांपासून अवघ्या काही फुटांच्या अंतरावर आणि रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांच्या अगदी जवळ कोसळले. अपघातानंतर संपूर्ण परिसरात काळ्या धुराचे लोट पसरले. क्षणार्धात हा अपघात झाला. आगीचे लोळ आणि धुराचे लोट पसरल्याने आकाश काळं झाल्याचं व्हिडीओत दिसून येतं आहे. या घटनेचा व्हिडीओही व्हायरल झाला आहे.

अपघात झालेलं हे विमान लिअरजेट ६० या प्रकारतलं होतं. दक्षिण फ्लोरिडातील निवसी भागातून जात असताना विमान अचानक खाली कोसळलं. रस्त्यावर मोठा स्फोट झाला आणि भीषण आग लागली. आकाशात आगीचा मोठा गोळा तयार झाल्याचं दृश्यांमध्ये दिसून आलं आहे. अपघातस्थळी काळा धूर आणि आगीच्या ज्वाळा पसरल्या होत्या. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार विमान निवासी घरांच्या अगदी जवळ कोसळलं. तसंच अचानक हा अपघात झाल्याने लोक खूप घाबरून गेले होते. विमान जर निवासी भाग असलेल्या घरांवर कोसळलं असतं तर कदाचित आणखी मोठा अपघात झाला असता. विमान आकाशातून कोसळतानाचा व्हिडीओ काही व्यक्तींनी रेकॉर्ड केला आहे, जो सोशल मीडियावर चर्चेत आला आहे.

'आम्ही मरणार आहोत...'

विमान दुर्घटनेपूर्वीच्या अत्यंत नाट्यमय वाटणाऱ्या हालचाली हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाच्या ऑडिओ रेकॉर्डिंगमधून समोर आल्या आहेत. हवामानाची परिस्थिती बिघडल्याचे लक्षात आल्यानंतर वैमानिकांनी तातडीने मदतीसाठी 'मेडे' कॉल केला होता. विमानाचा वेग नियंत्रणाबाहेर गेला असून ते प्रतिमिनिट तब्बल २० हजार ते ३० हजार फूट वेगाने खाली जात असल्याची माहिती क्रू मेंबर्सनी दिली होती. "आम्ही मरणार आहोत, आमच्याकडे वेळ उरलेला नाही," असे विमानातील एका महिला कर्मचाऱ्याचे अंतिम शब्द या रेकॉर्डिंगमध्ये कैद झाल्याचे वृत्त आहे.

'मतदार यादीतील घुसखोरांना काँग्रेस संरक्षण देतंय'; अमित शाहांचा आरोप

महाईन्यूज । नेपाळ

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात मागील काही दिवसांपासून देशभरात आंदोलन सुरू आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांनी केली आहे. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) आणि निवडणुकीतील कथित गैरप्रकारांविरोधात इंडिया आघाडीच्यावतीने १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चात बोलताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार टीका केल्याचं पाहायला मिळालं.



इंडिया आघाडीच्या १ नोव्हेंबरच्या रॅलीनंतर आता भाजपाच्यावतीने आज (२ नोव्हेंबर) हैदराबादमध्ये 'लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ' महारॅली काढण्यात आली. या महारॅलीच्या सभेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधी यांच्यासह सर्वच विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल केला. 'भाजपा प्रत्येक घुसखोराला बाहेर काढणारच', असं म्हणत मतदार यादीतील घुसखोरांना काँग्रेस संरक्षण देत असल्याचा आरोप यावेळी बोलताना अमित शाह यांनी केला आहे.

"हैदराबादमध्ये आज हजारो लोक रस्त्यावर उतरले आहेत. लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ या महारॅलीसाठी हे लोक रस्त्यावर उतरले आहेत. काल दिल्लीत एक रॅली काढण्यात आली होती आणि ती रॅली राहुल गांधींनी आयोजित केली होती. राहुल गांधींनी दावा केला की त्यांची रॅली 'व्होट बचाव' रॅली होती. मात्र, त्यांची रॅली ही 'व्होट बचाव' रॅली नव्हती, तर घुसखोरांना वाचवा अशी रॅली होती", अशी टीका अमित शाह यांनी केली.

"काँग्रेस पक्ष बोगस मतदानाच्या माध्यमातून निवडणुका जिंकू इच्छित आहे. जर एका व्यक्तीची दोन मते असतील, तर त्यापैकी एक मत रद्द व्हायला हवं की नको? आता राहुल बाबा यांच्या पोटदुखीचं मूळ कारण समोर आलं आहे. तीन कोटी मतं अशी आहेत, ज्यांच्या नावावर ती नोंदवली गेली आहेत, असे लोक अस्तित्वातच नाहीत. हे बांगलादेशी घुसखोर आहेत", असंही अमित शाह यांनी म्हटलं आहे.

'मतदार यादीतील घुसखोरांना काँग्रेस संरक्षण देतंय'

"एसआयआरला विरोध करून काँग्रेस पक्ष देशाच्या मतदार याद्यांमधील बांगलादेशी घुसखोरांना वाचवू इच्छित आहे. मी आज येथे हे सांगायला आलोय की, राहुलजी आणि रेवंत रेड्डीजी तुम्ही कितीही प्रयत्न केले तरी भाजपा पक्ष हे सुनिश्चित करेल की प्रत्येक घुसखोराला मतदार यादीतून काढून टाकलं जाईल आणि त्यांना देशाबाहेर हाकलून दिलं जाईल. संपूर्ण काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष एसआयआरला रोखण्याचा प्रयत्न करत आहेत, कारण हे घुसखोर त्यांची 'व्होट बँक' आहेत. मात्र, आम्ही एसआयआरच्या बाजूने ठामपणे उभे आहोत. केवळ या देशाचे नागरिकच येथे मतदान करू शकतील", अशी टीका अमित शाह यांनी केली.

‘जेलर 2’ची बॉक्स ऑफिसवर 800 कोटींची कमाई!

सुपरस्टार रजनीकांत यांच्या ‘जेलर 2’ या चित्रपटाची बॉक्स ऑफिसवरील घोडदौड अजूनही सुरू आहे. रिलीजच्या तिसऱ्या वीकेंडमध्येही चित्रपटाने आपली पकड कायम ठेवली असून, 18 व्या दिवशी जगभरातील कमाईचा 800 कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. या यशासह रजनीकांत यांच्या कारकिर्दीत 800 कोटींचा आकडा गाठणारा हा पहिला चित्रपट ठरला आहे. तसेच, तमिळ चित्रपटसृष्टीतही या चित्रपटाने नवा विक्रम केल्याचा दावा वृत्तांमध्ये करण्यात आला आहे.

रजनीकांत यांचा मोठा चाहतावर्ग आणि चित्रपटाला मिळणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद यामुळे ‘जेलर 2’ची कमाई सातत्याने वाढत आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून त्याने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, रिलीज होऊन 18 दिवस उलटले असतानाही चित्रपटाची कमाई सुरूच आहे. सॅकनिल्कच्या सुरुवातीच्या आकडेवारीनुसार, चित्रपटाने 17 दिवसांत जगभरात 790.85 कोटी रुपयांचा व्यवसाय केला होता. त्यानंतर 18 व्या दिवशी 800 कोटी रुपयांचा टप्पा पार केला. त्यामुळे चित्रपटाच्या यशात आणखी एक मोठी भर पडली आहे. मात्र, 18 व्या दिवसाच्या जगभरातील कमाईचे अंतिम आकडे रात्री उशिरापर्यंत जाहीर होणे अपेक्षित होते. त्यामुळे चित्रपटाच्या एकूण कमाईत बदल होण्याची शक्यता आहे.



‘जेलर 2’ने केवळ परदेशातच नव्हे, तर भारतीय बॉक्स ऑफिसवरही दमदार कामगिरी केली आहे. चित्रपटाच्या कमाईने भारतात 450 कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. चित्रपटाने पहिल्या आठवड्यात 334.35 कोटी रुपयांची कमाई केली होती. तर दुसऱ्या आठवड्यात 95.55 कोटी रुपयांचा व्यवसाय केला. तिसऱ्या आठवड्यातही चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. चित्रपटाने 16 व्या दिवशी 5.50 कोटी रुपये, तर 17 व्या दिवशी 9.35 कोटी रुपयांची कमाई केली. 18 व्या दिवशी रात्री 8.30 वाजेपर्यंत चित्रपटाने 7.90 कोटी रुपये कमावल्याची माहिती समोर आली होती.

लग्नाबाबत जान्हवीचा खुलासा!



बॉलीवुड कलाकार जान्हवी कपुर ही नेहमीच तिच्या चित्रपटांमुळे आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. आणि ती आता नुकतीच लोकप्रिय शो ‘कॉफी विथ करण’ या मध्ये वरुण धवन सोबत दिसली होती. 28 ऑक्टोबर रोजी प्रसारीत झालेल्या या भागात अर्जुन कपुरही विशेष पाहुणा म्हणुन आला होता. या दरम्यान सर्वांनी त्याच्या नात्याबाबात आणि लग्नाविषयी गप्पागोष्टी केल्या, त्यावेळी जान्हवी कपुरने तिच्या लग्नाच्या योजनेबाबत उत्तर दिले. ती म्हणाली की, सध्या लग्न करण्याची तिची कोणतीही योजना नाही. माझ्या अनेक चाहत्यांनी प्रश्न पडला असेल पण त्यासाठी त्यांना आणखी काही वर्षे थांबावे लागेल. तसेच जान्हवीने तिच्या जवळच्या मित्रांच्या नात्यांबद्दल आणि ते कठीण काळात एकमेकांना कसे साथ देतात याबद्दलही मनमोकळेपणाने सांगितले. करण जोहर त्याच्या शोमध्ये पाहुण्यांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत विचारतो. त्यामुळे त्याच्या शो बाबत चर्चा आणि या शो अनेक चाहते आहेत. जान्हवी कपूरसोबतच्या संभाषणादरम्यान, त्याने अभिनेत्रीच्या लग्नाच्या योजनांबद्दलही विचारण्याचा प्रयत्न केला. जेव्हा करणने तिला विचारले की ती लग्न कधी करणार आहे, तेव्हा जान्हवीने कोणताही संकोच न बाळगता उत्तर दिले की पुढील दोन ते तीन वर्षांत लग्नाची शक्यता नाही.



‘महाराणी’चा पाचवा सीझन येणार!

लोकप्रिय वेबसीरिज ‘महाराणी’च्या प्रत्येक भागाला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम मिळाले. पहिल्या चार भागांच्या यशानंतर लवकरच ‘महाराणी’ सीझन पाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे समोर आले आहे. ‘महाराणी’च्या पाचव्या सीझनबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. या सीरीजमध्ये हुमा कुरेशी राणी भारतीच्या भूमिकेतून पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, या सीरिजच्या आगामी भागाचं शूटिंग पूर्ण झालं असून, सध्या पोस्ट-प्रॉडक्शनवर काम सुरू आहे. लडाख, दिल्ली आणि भोपाळमधील विविध ठिकाणी याचे शूटिंग करण्यात आलं आहे. माहितीनुसार, या लोकप्रिय सीरिजचं दिग्दर्शन सुभाष कपूर यांनी केलं आहे. वृत्तानुसार, ‘महाराणी ५’ जानेवारी २०२७ च्या सुरुवातीला ओटीटीवर प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. मात्र, निर्मात्यांनी अद्याप प्रदर्शनाची तारीख जाहीर केलेली नाही. ‘महाराणी’ या सीरिजमध्ये बिहारमधील राजकीय वातावरण दाखवण्यात आलं आहे. हे पहिल्या तीन सीझनमधून प्रेक्षकांपर्यंत पोहोचलं आहे. आता हे चौथ्या सीझनमध्ये हे राजकारण दिल्ली दरबारी जातं आणि कशाप्रकारे हालचाली घडतात, ते दाखवण्यात आलं आहे. आता पाचव्या सीझनमध्ये नेमकं काय पाहायला मिळणार? याची अनेकांना उत्सुकता लागली आहे.

टी-२० क्रिकेटमध्ये भारताचा विश्वविक्रम!

एका कॅलेंडर वर्षात ४०० षटकार ठोकणारा भारत ठरला जगातील पहिलाच संघ

महाईन्यूज । नवी दिल्ली

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये झालेल्या ५ टी -२० सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघाने ३-२ ने विजय मिळवला. मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी १९२ धावांचे आव्हान ठेवले होते. पण न्यूझीलंडने हे आव्हान सहज पूर्ण केलं. या सामन्यात भारतीय संघाने इतिहास घडवला आहे. भारतीय संघाने या सामन्यात फलंदाजी करताना ४०० षटकारांचा आकडा पार केला आहे. भारतीय संघ हा टी-२० क्रिकेटमधील एकाच वर्षात ४०० षटकार खेचणारा जगातील पहिलाच संघ ठरला आहे.



भारतीय संघात एकापेक्षा एक पावर हिटर्स आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाचव्या टी-२० सामन्यादरम्यान नमन धीरने जो षटकार खेचला तो भारताचा या वर्षातील टी-२० क्रिकेटमधील ४०० वा षटकार ठरला. मुख्य बाब म्हणजे, भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत १४२ षटकार खेचले आहेत. जे आतापर्यंतचे सर्वाधिक षटकार आहेत. या यादीत दुसरू स्थानी असलेल्या ऑस्ट्रियाने गेल्या वर्षी ३६ सामन्यांमध्ये फलंदाजी करताना ३२६ षटकार खेचले होते. तर या यादीत तिसऱ्या स्थानीही भारतीय संघ आहे. भारतीय संघाने २०२२ मध्ये ४० सामन्यांमध्ये २८९ षटकार खेचले होते.

यावर्षी भारतीय फलंदाजांनी देखील चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला आहे. भारतीय संघाकडून फलंदाजी करताना अभिषेक शर्माने ८६ षटकार खेचले आहेत. तर इशान किशनच्या नावे ६० षटकारांची नोंद आहे. तर या यादीत तिसऱ्या स्थानी असलेल्या संजू सॅमसनच्या नावे ५० षटकार मारण्याची नोंद आहे.

भारताचा पराभव

प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून इशान किशनने सर्वाधिक ६१ धावांची खेळी केली. तर कर्णधार श्रेयस अय्यर ५० धावांवर माघारी परतला. शेवटी नमन धीरने ३३ आणि नितीश कुमार रेड्डीने २२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ८ गडी बाद १९१ धावा केल्या. १९२ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंडकडून टीम सेफर्टने सर्वाधिक ९३ धावांची खेळी केली. तर डॅरिल मिचेलने आणि शेवटी ग्लेन फिलिप्सने नाबाद ६५ धावांची खेळी करून न्यूझीलंडला ७ गडी राखून विजय मिळवून दिला.

मुंबई इंडियन्सकडून हार्दिकच्या ट्रेडची चर्चा; कोलकाता नाईट रायडर्स उत्सुक

महाईन्यूज । मुंबई

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्यासंदर्भात ट्रेड ऑफच्या वार्ता पुन्हा जोर धरू लागल्या आहेत. चेन्नईनंतर कोलकाता नाईट रायडर्सचं नाव हार्दिकच्या ट्रेडऑफबाबत चर्चेत आहे. गेल्या हंगामात अजिंक्य रहाणेने कोलकाताचं नेतृत्व केलं होतं. अजिंक्यने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारल्याने कोलकाताला सक्षम कर्णधाराची आवश्यकता आहे.



मुंबई इंडियन्सच्या माध्यमातून हार्दिकने आयपीएल पदार्पण केलं होतं. वादळी खेळी, कोणत्याही टप्प्यावर गोलंदाजी करू शकणारा गोलंदाज, अफलातून क्षेत्ररक्षक आणि सक्षम कर्णधार यामुळे हार्दिक संघात असणं अत्यंत फायदेशीर असतं. मुंबई इंडियन्सच्या पाच जेतेपदांमध्ये हार्दिकचा मोलाचा वाटा आहे. मात्र २०२३ मध्ये हार्दिकने मुंबईला रामराम करत गुजरात टायटन्स या नव्या संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला. पहिल्याच हंगामात हार्दिकच्या नेतृत्वात गुजरातने जेतेपदावर नाव कोरण्याची किमया केली. दुसऱ्या वर्षीही गुजरातने फायनलमध्ये धडक मारली. यानंतर हार्दिकने मुंबई इंडियन्सकडे परतण्याचा निर्णय घेतला. हार्दिकच्या ट्रेडऑफची प्रचंड चर्चा झाली होती.

हार्दिक परतल्यानंतर मुंबई इंडियन्स संघव्यवस्थापनाने त्याच्याकडे नेतृत्वाची धुरा सोपवली. २०२४ टी२० वर्ल्डकपविजेता कर्णधार आणि मुंबईचा राजा हिटमॅन रोहित शर्माला बाजूला केल्यामुळे हार्दिकला प्रचंड रोषाला सामोरं जावे लागले. हार्दिकला मुंबई इंडियन्सबरोबरच्या दुसऱ्या इनिंग्जमध्ये वैयक्तिक खेळाडू म्हणून आणि कर्णधार म्हणून लौकिकाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. मुंबईला प्लेऑफसाठीही पात्र ठरता न आल्याने संघव्यवस्थापनाने कठोर निर्णय घ्यायला सुरुवात केली.

रोहित शर्मा कर्णधारपदी परतण्याची शक्यता असल्याने हार्दिकच्या ट्रेडऑफची चर्चा पुन्हा तीव्र झाली. सुरुवातीला हार्दिक चेन्नई सुपर किंग्सकडे जाणार अशी चर्चा होती. हार्दिक धोनीचा अतिशय जिवलग मित्र आहे. हार्दिकसारखा अष्टपैलू खेळाडू चेन्नई संघाची ताकद वाढवू शकतो. मात्र काही काळानंतर या चर्चा विरल्या. आता केकेआर रिंगणात उतरलं आहे. चर्चेच्या पहिल्या टप्प्यात केकेआर व्यवस्थापन हार्दिकसाठी उत्सुक नव्हतं. खेळाडू म्हणून हार्दिकने कर्तृत्व सिद्ध केलं असलं तरी त्याच्या फिटनेसंदर्भात चिंता आहे. दुखापतींच्या ससेमिऱ्यात अडकल्याने हार्दिक प्रदीर्घ काळ भारतीय संघासाठीही खेळू शकलेला नाही. आयपीएल हंगाम संपल्यानंतर हार्दिक एकही सामना खेळू शकलेला नाही.

रिटेन्शनसाठी १५ नोव्हेंबर ही डेडलाईन आहे तर १६ डिसेंबर रोजी गोव्यात लिलाव होणार आहे. ट्रेडिंग विंडो लिलावाच्या आधी आठवडाभर बंद होईल. लिलावानंतर एका आठवड्यानंतर पुन्हा खुली होईल आणि पुढचा हंगाम सुरू होण्याच्या महिनाभर आधी पुन्हा बंद होईल.

हार्दिकबरोबर कायम असणाऱ्या लवाजम्यामुळे केकेआर त्याला ताफ्यात घेण्यासाठी सुरुवातीला उत्सुक नव्हतं. मात्र आता नव्याने चर्चेला सुरुवात झाल्याचं वृत्त टेलिग्राफने दिलं आहे. हार्दिकला ताफ्यात घ्यायचं तर कोलकाताला किमान दोन खेळाडूंना रिलीज करावं लागेल. केकेआरचं हुकूमी अस्त्र सुनील नरिन, वरुण चक्रवर्ती आणि धडाकेबाज फिनिशर रिंकू सिंह यांना रिलीज करण्यास तयार नाही. या तिघांबाबत कोणताही चर्चा होणार नाही असं केकेआरने स्पष्ट केलं.

कॅमेरुन ग्रीन दुखापती आणि ऑस्ट्रेलियाचं वेळापत्रक लक्षात घेता किती खेळेल याबाबत साशंकता असल्याने ट्रेडऑफ चर्चेत त्याचं नाव नाही.

मुंबई इंडियन्सचा संघ हार्दिकच्या बदल्यात हर्षित राणा आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्यासाठी प्रयत्नशील आहे. केकेआरला जिंकून देण्यात हर्षितचा मोठा वाटा होता. विकेटकीपर बॅट्समन अंगक्रिशने दोन्ही आघाड्यांवर स्वत:ला सिद्ध केलं आहे. मुंबईला भारतीय विकेटकीपर बॅट्समनची आवश्यकता आहे. अंगक्रिश उत्तम पर्याय ठरू शकतो. याव्यतिरिक्त तो मुंबईकर असल्यामुळे वानखेडे स्टेडियमवर खेळण्याचा प्रदीर्घ अनुभव कामी येऊ शकतो. अंगक्रिशच्या कारकिर्दीत महत्त्वाची भूमिका बजावणारे माजी खेळाडू अभिषेक नायर हेच केकेआरचे मुख्य प्रशिक्षक असणार आहेत. त्यामुळे लाडक्या शिष्याला रिलीज करण्यास ते तयार होण्याची शक्यता कमी आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। मंगळवार ।
दि. 03 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

पिंपरी-चिंचवडकरांच्या माथी १,२४६ कोटींचा बोजा?

महापालिकेच्या तिजोरीला कर्जाचा विळखा



AI GENERATED IMAGES

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

शहरातील पाणीपुरवठा, सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा व्यवस्थापन आणि इतर महत्त्वाच्या विकास प्रकल्पांसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने मोठ्या प्रमाणावर कर्ज उभारणीचे नियोजन केले आहे. अंदाजे १,२४६ कोटी ५० लाख रुपये अथवा प्रत्यक्ष प्रकल्प किमतीच्या ५० टक्के कर्ज दहा वर्षांच्या कालावधीसाठी उभारण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या ४ नोव्हेंबरच्या बैठकीपुढे ठेवण्यात आला आहे. या कर्जामुळे विकासकामांना निधी मिळणार असला, तरी परतफेडीची जबाबदारी आणि महापालिकेवरील अतिरिक्त आर्थिक भार विचारात घेणे आवश्यक असल्याचे प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.

स्थायी समितीच्या कार्यपत्रिकेतील विषय क्रमांक २७ नुसार, बँका, वित्तीय संस्था, कर्जरोखे आणि इतर मान्य वित्तीय स्रोतांमधून निधी उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली 'विविध वित्तीय स्रोतांद्वारे निधी उभारणी समिती' स्थापन करणे आणि संबंधित अधिकार प्रदान करण्याचाही प्रस्ताव आहे. स्थायी समितीमार्फत हा विषय महापालिका सभेकडे मान्यतेसाठी शिफारस करण्यात येणार आहे.

पाणी, सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनाला निधी

प्रस्तावातील वित्तीय आराखड्यात शहराच्या मूलभूत सुविधांशी संबंधित मोठ्या प्रकल्पांचा समावेश आहे. पाणीवितरणातील गळती आणि महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी 'डिस्ट्रिक्ट मीटर्ड एरिया' अर्थात 'डीएमए' तयार करण्याच्या ६६६ कोटी रुपयांच्या प्रकल्पाचा यात समावेश आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया व पुनर्वापरासाठी ७८५ कोटी रुपये, तर एकात्मिक घनकचरा व्यवस्थापनाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १,३५३ कोटी रुपयांचा प्रकल्प प्रस्तावित आहे. मोशी रुग्णालयाच्या ५०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचाही वित्तीय आराखड्यात उल्लेख आहे. या प्रकल्पांसाठी कर्ज, सार्वजनिक-खासगी भागीदारी, केंद्र शासनाच्या 'अर्बन चॅलेंज फंड'मधील अनुदान आणि महापालिकेचा स्वहिस्सा अशा विविध माध्यमांतून निधी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. प्रत्येक प्रकल्पाची निधी उभारणीची पद्धत आणि उपलब्ध अनुदान वेगवेगळे असल्याने प्रत्यक्ष कर्जाची गरज प्रकल्पनिहाय निश्चित केली जाणार आहे.

उत्पन्नाच्या तुलनेत खर्चवाढ अधिक

महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत प्रस्तावात महत्त्वाची नोंद करण्यात आली आहे. सन २०१९-२० पासून महापालिकेचे उत्पन्न ६ टक्क्यांनी वाढले असताना महसुली खर्चात १८ टक्के वाढ झाल्याचे नमूद आहे. उत्पन्न आणि खर्चाच्या वाढीचा हाच कल कायम राहिल्यास सन २०२९-३० मध्ये भांडवली कामांसाठी किंवा कर्ज उभारणीसाठी निधी उपलब्ध राहणार नसल्याची शक्यताही प्रशासनाने नोंदविली आहे. या पार्श्वभूमीवर उत्पन्नवाढ, खर्चनियंत्रण आणि कर्ज परतफेडीचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. विकास प्रकल्पांची प्राधान्यता, महापालिकेची आर्थिक क्षमता आणि दीर्घकालीन आर्थिक हित लक्षात घेऊन कर्ज उभारणीची प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता प्रस्तावात अधोरेखित केली आहे.



नव्या कर्जापोटी वर्षाला १८३ कोटींची परतफेड

कार्यपत्रिकेतील प्राथमिक वित्तीय तक्त्यानुसार, प्रस्तावित कर्जाची वार्षिक सरासरी मुद्दल परतफेड सुमारे १२४ कोटी ६५ लाख रुपये आणि व्याज सुमारे ५८ कोटी ७९ लाख रुपये असे गृहीत धरण्यात आले आहे. त्यानुसार नव्या कर्जाच्या मुद्दल आणि व्याजापोटी वार्षिक सुमारे १८३ कोटी ४४ लाख रुपयांची परतफेड अपेक्षित असल्याचे आकडेवारीतून दिसते. हे प्राथमिक अंदाज असून प्रत्यक्ष कर्जाची रक्कम, व्याजदर आणि परतफेडीच्या अटी निश्चित झाल्यानंतर अंतिम आर्थिक दायित्व स्पष्ट होईल. महापालिकेची विद्यमान कर्जे आणि त्यावरील देणी विचारात घेऊनच नव्या कर्जाबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याचेही प्रस्तावात नमूद आहे.

अंतिम कर्जरक्कम गरजेनुसार ठरणार



प्रत्येक प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, उपलब्ध अनुदान आणि प्रत्यक्ष निधीची आवश्यकता तपासून कर्जाची अंतिम रक्कम निश्चित केली जाणार आहे. कर्ज घेण्यासाठी शासनाची मान्यता मिळविण्याचा प्रस्ताव सादर करणे आणि निधी उभारणीसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाला मान्यता देणे यांचाही प्रस्तावात समावेश आहे. सध्या हा विषय स्थायी समितीच्या कार्यपत्रिकेत प्रस्तावाच्या स्वरूपात आहे. त्यामुळे कर्जाला अंतिम मंजुरी मिळालेली अथवा प्रत्यक्ष कर्ज उभारण्यात आलेले नाही. स्थायी समितीची शिफारस, महापालिका सभेची मान्यता आणि आवश्यक शासकीय प्रक्रियेनंतर कर्ज उभारणीचा मार्ग निश्चित होणार आहे.

मोशी रुग्णालयाच्या कर्जाबाबत स्वतंत्र विचार

मोशी रुग्णालय प्रकल्पासाठी कर्ज घेतल्यास शासनाकडून अनुदान उपलब्ध होणार नसल्याची स्पष्ट नोंद प्रस्तावात आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, तांत्रिक व शासकीय मान्यता आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून ५० टक्के कामही पूर्ण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी 'आयएफसी'मार्फत घेण्यात येणारे कर्ज, त्याअनुषंगाने 'एमयूडब्ल्यूआरईपी'कडून मिळणारे वित्तीय लाभ आणि त्यातून होणारे फायदे विचारात घेऊन निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

१७१ कोटी खर्च, तरीही पाणी नाही!

पवना जलवाहिनीच्या वादात आता वकिलांच्या ३० लाखांच्या फीचा प्रस्ताव!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पवना धरणातून थेट पाणी आणण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च झाले; मात्र या बंद जलवाहिनीतून पिंपरी-चिंचवडकरांना एक थेंबही पाणी मिळालेले नाही. रखडलेल्या प्रकल्पाचा आर्थिक भार कमी होण्याऐवजी आता लवादातील सुनावण्या आणि वकिलांच्या शुल्काची भर पडत आहे. महापालिकेच्या स्थायीसमिती कार्यपत्रिकेतील विषय क्रमांक ५२ नुसार वरिष्ठ वकिलाला ३० लाख २० हजार रुपये शुल्क अदा करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांच्या पाण्यासाठी हाती घेतलेल्या योजनेतून प्रत्यक्ष पाणी कधी मिळणार आणि तोपर्यंत खर्चाची ही मालिका कुठवर चालणार, असा थेट प्रश्न उपस्थित होतो.

पवना थेट पाइपलाइन प्रकल्पाचे ठेकेदार मे. एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांनी कामासंदर्भात महापालिकेविरुद्ध ४९६ कोटी रुपयांचा दावा दाखल केल्याचे प्रस्तावात नमूद आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्यासमोर मुंबई येथे लवादाची सुनावणी सुरू आहे. हा ठेकेदाराने केलेला दावा असून, ही रक्कम देण्याचा अंतिम निर्णय झाल्याचे प्रस्तावात नमूद नाही. मात्र, प्रकल्प रखडल्याची किंमत महापालिकेला कायदेशीर लढाईवरील खर्चातूनही मोजावी लागत असल्याचे या कागदपत्रांतून स्पष्ट होते.

या प्रकरणात महापालिकेतर्फे ॲड. केदार दिघे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना ४० लाख रुपये यापूर्वीच अदा करण्यात आल्याचे कार्यपत्रिकेत स्पष्टपणे नमूद आहे. प्रकरणाची व्याप्ती आणि दाव्याची मोठी रक्कम विचारात घेऊन त्यांच्यासोबत वरिष्ठ वकील म्हणून ॲड. दिपेन ही मर्चंट यांची नियुक्ती करण्यात आली. मर्चंट यांच्या शुल्कापोटी आता आणखी ३० लाख २० हजार रुपये अदा करण्यासाठी मान्यता मागण्यात आली आहे. आधी अदा केलेले शुल्क आणि सध्याचा प्रस्ताव मिळून रक्कम ७० लाख २० हजार रुपये होते; त्यातील ३० लाख २० हजार रुपयांना अद्याप प्रस्तावित खर्च म्हणूनच पाहावे लागेल.

वरिष्ठ वकिलासाठी मंजूर दरांनुसार प्रत्येक सुनावणी सत्राला दोन लाख रुपये, सल्लामसलतीसाठी प्रत्येक तासाला किंवा तासाच्या भागासाठी ४० हजार रुपये, तर प्रत्येक प्रतिज्ञापत्र अथवा लेखी मांडणी तयार करण्यासाठी दीड लाख रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. सादर केलेल्या तीन शुल्कतक्त्यांमध्ये अनुक्रमे सात लाख २० हजार, १९ लाख ८० हजार आणि तीन लाख २० हजार रुपये दाखवण्यात आले आहेत. भविष्यातही कामानुसार शुल्क द्यावे लागणार असल्याचा उल्लेख प्रस्तावात आहे. त्यामुळे सध्याच्या रकमेनंतरही खर्च सुरू राहण्याची शक्यता दस्तऐवजातूनच दिसते.



आतापर्यंत सुमारे १७१ कोटी खर्च...

पवना बंद जलवाहिनीचा इतिहास पाहता ही बाब अधिक गंभीर ठरते. आतापर्यंत प्रकल्पावर सुमारे १७१ कोटी रुपये खर्च होऊनही बंद जलवाहिनीतून शहराला पाणी मिळाले नव्हते. कामाची बिले, पाइपचे स्थलांतर, जागेचे भाडे, सुरक्षा आणि सल्लागार अशा विविध बाबींवर खर्च झाल्याचे त्या वृत्तात नमूद आहे. हा त्या वेळचा प्रकाशित आकडा आहे; आजपर्यंतच्या एकत्रित खर्चाचा अद्ययावत हिशेब महापालिकेने जाहीर करणे आवश्यक आहे. नागरिकांना पाण्याऐवजी खर्चाचे आकडेच मिळत राहणार का? प्रकल्पावर आधी झालेला खर्च, ठेकेदाराचा प्रलंबित दावा आणि आता वाढत असलेला कायदेशीर खर्च यांचा एकत्रित विचार होणे गरजेचे आहे. लवादात महापालिकेची बाजू मांडण्यासाठी वकील नेमण्याची आवश्यकता असली, तरी त्यातून प्रकल्पाच्या दीर्घ विलंबाची जबाबदारी संपत नाही. योजनेची सद्यःस्थिती काय, आतापर्यंत नेमका किती खर्च झाला आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक कोणते, याची उत्तरे प्रशासनाने द्यायला हवीत.

पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा..

करदात्यांच्या पैशातून प्रत्येक बिल चुकते होत असताना पाणीपुरवठ्याचे आश्वासन मात्र अपूर्ण राहणे स्वीकारार्ह कसे ठरेल? स्थायीसमितीने केवळ वकिलांच्या शुल्काला मान्यता देऊन विषय निकाली काढण्याऐवजी संपूर्ण प्रकल्पाच्या खर्चाचा आणि विलंबाचा हिशेब मागवायला हवा. पाण्यासाठी उभारलेल्या योजनेचे मोजमाप खर्चाच्या कोटींमध्ये नव्हे, तर नागरिकांच्या नळापर्यंत पोहोचलेल्या पाण्यात झाले पाहिजे.

पिंपरी-चिंचवड पोलिस दल होणार हायटेक; ६५ वाहने, ३५० कॅमेरे अन् ४ ड्रोन!

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

वाढत्या शहरासोबत विस्तारत चाललेली पोलिसांची जबाबदारी पेलण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस दलाला आता आधुनिक तंत्रज्ञान आणि भक्कम पायाभूत सुविधांचा बूस्टर डोस मिळणार आहे. स्वतंत्र मुख्यालय, सुसज्ज पोलिस संकुल, अत्याधुनिक वाहतूक नियंत्रण यंत्रणा आणि गस्तीसाठी नवीन वाहनांच्या माध्यमातून पोलिस दलाची ताकद वाढविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ३) या प्रकल्पांचा शुभारंभ होणार असून, ६५ नवीन वाहने, ३५० बॉडी वॉर्न कॅमेरे आणि चार ड्रोन पोलिसांच्या ताफ्यात दाखल होणार आहेत.



आकुर्डी प्राधिकरणातील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात दुपारी दीड वाजता हा कार्यक्रम होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पोलिस महासंचालक सदानंद दाते विशेष अतिथी म्हणून उपस्थित असतील.

पोलिस आयुक्तालयाच्या स्वतंत्र मुख्यालयासाठी ताथवडे येथे मंजूर झालेल्या जागेच्या सातबारा उताऱ्याचे औपचारिक हस्तांतरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यामुळे स्वतंत्र मुख्यालयाच्या उभारणीच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे. याचवेळी पिंपरी येथे उभारण्यात येणाऱ्या पोलिस संकुलाचे भूमिपूजन होणार आहे. या संकुलात पिंपरी पोलिस ठाणे, परिमंडळ एकच्या पोलिस उपआयुक्तांचे कार्यालय, अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सचे विभागीय कार्यालय आणि पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी २०० शासकीय निवासस्थाने असणार आहेत.

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षितता अधिक मजबूत करण्यासाठी सीसीटीव्ही व एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (आयटीएमएस) प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे वाहतुकीवरील देखरेख आणि नियमभंग करणाऱ्यांवरील कारवाई अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे. बॉडी वॉर्न कॅमेऱ्यांमुळे पोलिसांच्या प्रत्यक्ष कारवाईचे चित्रीकरण होणार असून, ड्रोनच्या माध्यमातून गर्दीची ठिकाणे, मिरवणुका आणि बंदोबस्तावर हवाई नजर ठेवता येणार आहे. नवीन वाहनांमुळे पोलिसांची गस्त आणि आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसादक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

अमली पदार्थांच्या विळख्यातून तरुणाईला दूर ठेवण्यासाठी 'नशामुक्त पिंपरी-चिंचवड' अभियानांतर्गत ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थी आणि नागरिकांशी थेट संवाद साधून अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रतिभा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी

दिवाळीनिमित्त वात्सल्य संस्थेसाठी ४,५०० मेणबत्ती पाकिटांचे पॅकिंग; विद्यार्थ्यांचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्यूटर स्टडीजच्या विद्यार्थी विकास समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना व प्रतिभा ज्यूनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी सणाचे औचित्य साधून एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा आणि संचालिका डॉ. तेजल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

या उपक्रमांतर्गत देहूगाव येथील 'वात्सल्य मतिमंद, निराधार मुले व महिला निवासी शाळा' या संस्थेसाठी विद्यार्थ्यांनी तब्बल ४,५०० मेणबत्ती पाकिटांचे पॅकिंग केले. दिवाळीच्या आनंदात या विशेष घटकांना हातभार लागावा आणि त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्यास मदत व्हावी, हा यामागील मुख्य उद्देश होता.

या सामाजिक उपक्रमात प्रतिभा महाविद्यालयाच्या सिनिअर व ज्यूनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी एकोप्याने आणि शिस्तबद्ध पद्धतीने हे पॅकिंग पूर्ण करत 'टीमवर्क', सामाजिक बांधिलकी व सेवाभावाचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. या उल्लेखनीय कार्याबद्दल वात्सल्य संस्थेच्या संस्थापिका वृशाली देवतरासे यांनी कमला एज्यूकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ . दीपक शहा, प्राचार्या , प्राध्यापक , व विद्यार्थ्यांचे विशेष आभार मानले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिभा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया आणि आयक्यूएसी विभागाच्या समन्वयक डॉ. श्रुती गणपुले यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

"विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, सहानुभूती आणि



समाजसेवेची भावना रुजावी, यासाठी असे समाजाभिमुख कार्यक्रम नियमितपणे राबविले जातात. भविष्यातही गरजेनुसार सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अशा उपक्रमांचे आयोजन केले जाईल," असे मनोगत संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन विद्यार्थी विकास समितीच्या प्रमुख प्रा. ज्योती इंगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुकलाल कुंभार, प्रा. सुप्रिया गायकवाड व अन्य प्राध्यापकांनी केले.

राजमाता जिजाऊ कॉलेज ऑफ फार्मसी आयोजित 'स्टार्टअप टॉक २.०' उत्साहात संपन्न

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसी, डुडुळगाव येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (एसपीपीयू), पुणे प्रायोजित 'स्टार्टअप टॉक २.०' या उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



कार्यक्रमात सिरी संस्थेचे सहसंस्थापक श्री. सचिन कुंभोजे यांनी 'तरुण नवकल्पकांसाठी उद्योजकतेच्या संधी' या विषयावर, तर कॅलिडस रिसर्च लॅबोरेटरीज, पुणेचे सहसंस्थापक श्री. शैलेश बी. शिंदे यांनी 'औषधनिर्माण क्षेत्रातील कल्पनेपासून उद्योगनिर्मितीपर्यंतचा प्रवास' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी स्टार्टअपच्या विविध संधी, व्यवसाय उभारणीतील आव्हाने, नावीन्यपूर्ण कल्पनांचे व्यावसायिक रूपांतर आणि उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये यांविषयी मार्गदर्शन केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राइज (सीआयआयई) यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, उद्योजकता आणि स्टार्टअप संस्कृती विकसित करणे हा आहे. विद्यार्थ्यांना यशस्वी उद्योजकांशी थेट संवाद साधण्याची आणि त्यांच्या अनुभवांतून प्रेरणा घेण्याची संधी या कार्यक्रमामुळे उपलब्ध झाली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभा मतदारसंघाचे प्रथम आमदार मा. श्री. विलास लांडे, संस्थेचे सचिव मा. श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित गव्हाणे, विश्वस्त मा. श्री. विक्रांतजी लांडे, मा. श्री. सुमित मुंगसे तसेच व्यवस्थापन प्रतिनिधी प्रा. किरण चौधरी यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. प्रवीण जे. पाटील आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल बी. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधी शोधणारे न राहता स्वतःच्या नावीन्यपूर्ण कल्पनांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक बनावे, या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. हा उपक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) आणि स्टार्टअप इंडिया या संकल्पनांशी सुसंगत असून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि सर्जनशीलता विकसित करण्यास निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे पदाधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सीआयआयई केंद्र, प्रमुख वक्ते, आयोजन समिती, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF
LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support



ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in